# नावात 'महसूल' आहे!

म. टा. प्रतिनिधी, मुंबई

'नावात काय आहे?' हा प्रश्न मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनला विचारलात, तर 'नावातच मोठा 'महसूल' आहे' असे उत्तर त्यांच्याकडून मिळेल. कारण, कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो-३ मार्गावरील स्थानकांच्या नावाचे अधिकार मिळवण्यासाठी अनेक नामांकित कंपन्यांनी धाव घेतली आहे.

- मेट्रो-३च्या १८ स्थानकांच्या नावांसाठी ८७ अर्ज
- 'बीकेसी'साठी सर्वाधिक १२ अर्ज

विविध कंपन्यांद्वारे १८ स्थानकांसाठी तब्बल ८७ अर्ज एमएमआरसीकडे आले आहेत. यापैकी व्यापारी केंद्र म्हणून मान्यता पावलेल्या बीकेसी स्थानकासाठी सर्वाधिक १२ कंपन्यांनी आपली दावेदारी सादर केली आहे. यामधून एमएमआरसीला मोठ्या प्रमाणात महसूल मिळणार आहे.

मेट्रो-३ स्थानकांचे नामाधिकार मिळवण्यासाठी अलीकडेच एमएमआरसीच्या तिकीट-भाडेव्यतिरिक्त इतर महसुलासंबंधी सल्लागार ऑक्टस ॲडव्हायझर स्टुडिओ-पीओडीद्वारे विशेष प्रक्रिया राबविण्यात आली. या प्रक्रियेत एकूण २८ नामांकित ब्रँड मेट्रो-३ स्थानकांच्या नावाचे अधिकार घेण्यास उत्सुक असल्याचे समोर आले. काही कंपन्यांनी एकाहून अधिक स्थानकांच्या नाम अधिकारासाठी स्वारस्य दाखवले आहे. यामध्ये एलआयसी, इंडियन ऑइल यांसारख्या सार्वजनिक उपक्रम संस्थांसह स्टेट बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ बडोदा, यूटीआय, कोटक, आयडीएफसी फर्स्ट, एचएसबीसी यांसारख्या बँका आणि आर्थिक संस्थांनी स्वारस्य दाखवले आहे. तसेच इंडिगो, स्पाइसजेटसारख्या विमान कंपन्यांचादेखील यात समावेश आहे. त्याचसोबत जेएसडब्लू, ग्लॅक्सो स्मिथक्लाइन, टाइम्स समूह, ब्लॅकस्टोन, फीनिक्स मिल्ससारख्या कार्पोरेट कंपन्या, पिरामल, ओबेरॉय, डीबी रिअल्टीसारख्या नामांकित कंपन्यांही दावेदार आहेत.

यामध्ये बीकेसीसोबतच दादर व आंतरराष्ट्रीय विमानतळ या स्थानकांना उत्तम प्रतिसाद मिळाला आहे. या दोन स्थानकांसाठी प्रत्येकी नऊ अर्ज आले आहेत. तर देशांतर्गत विमानतळ व सीएसएमटी स्थानकाकरता प्रत्येकी सात अर्ज प्राप्त झाले आहेत.

## तिकीट दर नियंत्रणास मदत

'तिकीट- भाडे व्यतिरिक्त मिळणारा महसूल कुठल्याही वाहतूक व्यवस्थेच्या शाश्वत कामकाजासाठी महत्त्वाचा असतो. यामुळे तिकीटदर नियंत्रणात ठेवणे शक्य होते. स्थानकांच्या नाम अधिकाराद्वारे मिळणारा महसूल महत्त्वाचा स्रोत असेल. नामांकित कंपन्यांद्वारे प्रतिसाद उत्साह वाढवणारा आहे,' अशी प्रतिक्रिया एमएमआरसीचे व्यवस्थापकीय संचालक रणजीतसिंह देओल यांनी दिली.